एस.सी.सी. क्र. ३२४/२०२४

नि.क्र.२२

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांचा पुरावा**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – संदीप विष्णु गायकवाड

वय – ४२ वर्षे, व्यवसाय – पोहेकॉ

नेमणुक पारनेर पो.स्टे., पारनेर

**सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.एस.ए.पटेकर यांचेमार्फत**–

सदर गुन्हा दाखल करताना मी पारनेर पो.स्टे. येथे पोहेकॉ. म्हणुन होतो. दि.२९.०९.२०२३ रोजी मी टाकळी आउटपोस्टला पोहेकॉ. म्हणुन नेमणुकीस होतो. त्यादिवशी मो.अ.क्र.२/२०२३ मध्ये जखमी फिर्यादीने माझ्यासमोर हजर होवुन पो.स्टे.ला फिर्याद दिली होती व ती फिर्याद मीच घेतली होती. त्यानंतर कागदपत्रे पाठवुन ठाणे अंमलदाराने गुन्हा दाखल करुन तपास माझ्याकडे दिला. त्याबाबत लेखी आदेश नसुन ते मात्र दैनिक अहवालात नमुद आहे. त्यानंतर घटनास्थळी पंचनामा करुन साक्षीदारांचे जबाब घेतले. घटनास्थळ धोत्रे गावचे शिवारात शेत गट नं.१४ मध्ये कल्याण ते अ.नगर जाणारे हायवेवर होते. घटनास्थळ पंचनामा नि.१४ वर दाखल असुन त्यातील मजकुर बरोबर असुन त्यावर माझी, पंचांची सही असुन ते घटनास्थळ मला जखमी फिर्यादीने दाखवले होते. त्यानंतर आरोपीस मो.वा.का.क.२०९ प्रमाणे नोटीस दिली. आता मला ती नोटीस दाखवण्यात आली. त्यातील मजकुर बरोबर असून त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यास नि.२३ देण्यात येते. त्यानंतर एसटी बस पंचनामा करुन जप्त केली. त्या बसचा पंचनामा एसटी डेपोत पंचांसमक्ष केला. आता मला तो पंचनामा दाखवण्यात आला. तो पंचनामा मोटार अपघातमध्येच केला असून तो दि.१२.९.२०२३ रोजीचा आहे. त्यातील मजकुर बरोबर असून त्यावर माझी, पंचांची व आरोपीची सही आहे. त्यास नि.२४ देण्यात येते. त्यानंतर मी माझ्या मोबाईलमध्ये त्या बसचे फोटो काढले. ते फोटो मला दाखवण्यात आले. त्यामध्ये बसचा नंबर एम एच १४ बीटी २७४६ आहे. त्या ३ फोटोंना आर्टीकल क ते ई देण्यात येते. त्यानंतर बसची तांत्रीक तपासणीकामी आगार प्रमुख पारनेर यांना पत्र दिले. ते पत्र मला दाखवण्यात

आले. ते तेच असुन त्यावर माझी सही व मिळाल्याबाबत आगार मधील व्यवस्थापकाची सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास नि.२५ देण्यात येते. त्याचदिवशी तांत्रीक तपासणीचा अहवाल मला प्राप्त झाला व मी तो केसमध्ये दाखल केला. त्यानंतर आरोपीस त्याचदिवशी एसटी बस बॉण्ड व पावती घेवुन ताब्यात देण्यात आली. ती पावती मला दाखवण्यात आली. ती तीच असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी व आरोपीची सही असुन त्यास नि.२६ देण्यात येते. मला बॉण्ड दाखवण्यात आला असता त्यातील मजकुर बरोबर असुन त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यास नि.२७ देण्यात येते. त्यानंतर दि.१.१०.२०२३ रोजी जखमीची मोटार सायकल पंचनाम्याद्वारे टाकळी आउटपोस्ट येथे जप्त केली. आता मला तो पंचनामा दाखवण्यात आला. त्यातील मजकुर बरोबर असून त्यावर माझी, पंचांची व जखमीची सही आहे. त्यास नि.२८ देण्यात येते. त्यानंतर मी मोटार सायकलची तांत्रीक तपासणीसाठी साई मोटर्स टाकळी ढोकेश्वर यांना पत्र दिले. आता मला ते दि.१.१०.२०२३ रोजीचे पत्र दाखवण्यात आले. त्यातील मजकुर बरोबर असून त्यावर माझी व पी.आय.साहेबांची सही आहे. त्यास नि.२९ देण्यात येते. त्याचदिवशी मला अहवाल प्राप्त होवुन तो मी गुन्हयाचे कागदपत्रात समाविष्ट केला. त्यानंतर वाहन परत जखमीच्या ताब्यात देवुन पावती करुन त्याचदिवशी दिले. ती पावती मला दाखवण्यात आली. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी व जखमी फिर्यादीची सही आहे. त्यास नि.३० देण्यात येते. त्यानंतर दि.५.१०.२०२३ रोजी वैद्यकीय अधिकारी सीटी केअर हॉस्पीटल अ.नगर येथे जखमीचे प्रमाणपत्र मिळणेकरीता पत्र पाठवले. आता ते पत्र दि.५.१०.२०२३ चे मला दाखवण्यात आले. त्यावर माझी व हॉस्पीटलमधील कर्मचा–याची पोहोच म्हणुन सही असून त्यातील मजकुर बरोबर असुन त्यास नि.३१ देण्यात येते. त्यानंतर फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करुन दुसरे जखमी साक्षीदार खंडु ढोकळे यांनी उपचार घेतले नसल्याबाबत त्यांचा पुरवणी जबाब नोंदवला. तपासात आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगात चालवुन रोडचे विरुध्द बाजुस येवुन फिर्यादीच्या मोटार सायकलीस धडक देवुन अपघात केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याचेविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. एम.एस. औटी यांनी नाकारला.

तपास माझ्याकडे दि.२९.०९.२०२३ रोजी आला. फिर्याद मी स्वतः नोंदवली होती व साक्षीदारांचे जबाब मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले होते. खंडु ढोकळे यांनी मला त्यांच्या जबाबात त्यांना एसटीने ३०० फुट ओढत नेले व त्यांची मोटार सायकल एसटीमध्ये अडकल्याबाबत सांगितले नव्हते. कोणाला दुखापत झाली होती याबाबत मी तपास केला होता. खंडु ढोकळे यांच्या हातापायाला, डोक्याला मार लागुन ते बेशुध्द पडले असल्याचे त्यांनी माझ्यासमोर जबाबात सांगितले नव्हते. मी सांगतो की मार लागल्याचे सांगितले होते पण बेशुध्द झाल्याचे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की घटनेच्यादिवशी फिर्याद दाखल झाली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की घटना घडल्यानंतर मी स्वतः फिर्यादीचा जबाब घेण्यासाठी हॉस्पीटलला गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की दि.१६.९.२०२३ ते २९.९.२०२३ या दरम्यान फिर्यादीकडुन मी स्वतः घटनेबाबत तपास केला नाही. हे म्हणणे खरे आहे की त्याच कालावधीत मी फिर्याद देण्याबाबत काही तपास केला नाही. एसटी बस जप्त करण्याअगोदर डेपोला पत्र दिले नव्हते व त्यांची परवानगी घेतली नव्हती. एसटी पंचनामा मधील पंचांना मी नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की एसटी जप्त केली नव्हती व पंचनामा केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की आर्टीकल क ते ई वरील फोटो दुस–या एसटीचे असुन त्यामध्ये एसटीला कुठेही डॅमेज झालेला नाही. पंचनामा दुपारी २ ते ३ वाजता केला असेल. पंचांची नावे मला आता सांगता येणार नाही. घटनास्थळ पंचनाम्यावरील पंचांना मी नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळावर मी काही जप्त केले नाही व काही मिळुन आले नाही. हे म्हणणे खरे आहे की आर्टीकल अ व ब मधील फोटोत घटनास्थळवरील अपघाताच्या खाणाखुणा दिसत नाही व घटनास्थळावर गाडया दिसत नाही. हे म्हणणे खरे नाही की असा कोणताही पंचनामा मी केला नाही व घटनास्थळी गेलो नाही. खंडु ढोकळे यांनी पुरवणी जबाबात मार लागल्याबाबत सांगितले होते. त्याने तो गावी दाखल असल्याचे व त्याला जास्त मार लागल्याचे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की इतर साक्षीदारांचे जबाब मी फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले आहे. मोटार सायकल पंचनामा दि.१.१०.२०२३ रोजी मी स्वतः केला. त्यातील पंचांना मी नोटीस पाठवली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की तो

पंचनामा कोणत्याठिकाणी केला याबाबत कागदपत्र दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की अशी मोटार सायकल  नव्हती व मी पंचनामा केला नव्हता. साई मोटर्सचे रजिस्ट्रेशन असल्याबाबत मी कागदपत्र पाहीले नव्हते व त्यांच्याकडे तपासणीबाबत परवाना असल्याची मी चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की एसटीच्या चुकीमुळे अपघात झाला नव्हता. मी स्वतः वैद्यकीय प्रमाणपत्र आणण्यासाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की ते प्रमाणपत्र माझ्या सांगण्याप्रमाणे मी तयार केले. हे म्हणणे खरे नाही की असा कोणताच अपघात आरोपीच्या चुकीमुळे झाला नव्हता व आरोपीविरुध्द मी खोटे दोषारोपपत्र दाखल केले.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/-

(एन.एस.सबनीस)

दिनांकः २०/०२/२०२५. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.३,

पारनेर.